महाराष्ट्र शासन
# जिल्हा रुग्णालय, नाशिक

**आरोग्य सेवा**

दुरध्वनीक्र. कार्यालय-२५७२०३८
२५७६३६८

ई-मेलः-cs_nashik@rediffmail.com

पत्ता:- जिल्हा रुग्णालय,त्र्यंबकरोड,
गोल्फक्लब मैदानसमोर,नाशिक
फॅक्स क्र.- २५७७९४९
GSTIN-27NSKG-01242D1D1

जा.क्र. जिरुना/अवै भांडार/न.क्र. १४/दरपत्रक/ देखभालकरार / /२५ दिनांक -०९-२०२५
32553-56 16 SEP 2025

प्रति,
मा. सहसंचालक,
आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर)
मुंबई

विषय :- दरपत्रक प्रसिध्द करणे बाबत
संगणक/ नेटवर्कींग व प्रिंटर्स देखभाल व दुरुस्ती दर पत्रक करणे बाबत....
संदर्भ :- या कार्यालयाची मंजूर टिपणी दिनांक १०-०९-२०२५

महोदय

उपरोक्त विषयान्वये जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक येथिल रुग्णालयीन / कार्यालयीन कामकाजासाठी असलेली दळणवळणाची ईलेक्ट्रॉनिक साधने व संगणक प्रिंटर्स यांची दैनदिन देखभाल व दुरुस्तीसाठी दरपत्रक करण्याची कार्यवाही प्रस्तावीत होती.

ई- दरपत्रकांच्या आधारे आठ दिवसांचा कालावधी देऊन संगणक नेटवर्कीक व प्रिंटर्स देखभाल व दुरस्ती खर्च प्रक्रियाराबविणे क्रम प्राप्त ठरते. त्यानुसार सोबत दरपत्रक प्रसिध्दी प्रस्ताव यासह सादर करण्यात आला आहे. तरी सदर दरपत्रक निविदा आरोग्य सेवेच्या ई-पोर्टलवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

( डॉ.चारुदत्ता शिंदे )
जिल्हा शल्य चिकित्सक,नाशिक

प्रत माहितीस्तव सविनय सादर
मा. सहसंचालक, आरोग्य सेवा, ( खरेदी कक्ष ) मुंबई
मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक
मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक

महाराष्ट्र शासन

# जिल्हा रुग्णालय, नाशिक

आरोग्य सेवा
दुरध्वणी क्र. कार्यालय -२५७२०३८
२५७६३६८
GSTIN-27NSKG-01242D1D1

पत्ता - जिल्हा रुग्णालय, त्रंबकरोड,
गोल्फक्लब मैदानासमोर, नाशिक
ई-मेल - cs__nashik@rediffmail.com

## जाहीर नोटीस ( दरपत्रक निमंत्रित पत्र )

सुचित करण्यात येते की, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक येथिल संगणक / प्रिंटर्स /नेटवर्कींक (इंटरनेट कनेक्शन) कार्यान्विती देखभाल दुरुस्ती करार करण्यासाठी स्थानिक पुरवठादार यांचे कडून दर मागविण्याचे निश्चित केले आहे. तरि ईच्छुक पुरवठाधारकांनी खाली दिलेल्या अटी शर्तीचे अवलोकन करुन दरपत्रके मोहर बंद लिफाप्यात विहित कालावधीत प्रशासकिय कार्यालय जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे सादर करावे व पोहच प्राप्त करुन घ्यावी .

### दरपत्रके सादर करणा-या पुरवठाधारकांसाठी सर्वसाधारण अटी व शर्ती

१. इच्छुक पुरवठाधारकांनी बाब निहाय ( Itemwise ) दरपत्रके मोहरबंद लिफाप्यात सादर करावीत. यावर सरद जाहीर नोटीस जावक क्रमांक व दिनांक व ज्या बाबीचे दर पत्रक सादर केलेले आहे. त्याचे नांव ठळक अक्षरात असावे.

२. एका पुरवठाधारकास बाबनिहाय फक्त एक दरपत्रक सादर करण्याची मुभा आहे. कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असु नये. असे थेट स्वारस्य असल्यास तो हितसंबंधाचा संघर्ष म्हणुन समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकारण्यात येतील. उदा जर दोन कंपन्या एकाच बाबीसाठी / प्रकल्पासाठी / निविदा सादर करणार असतील तर एक व्यक्ती ज " कंपनी एक्स " चा मालक / संचालक / भागिदार / बहुसंख्या भागधारक असेल तीच व्यक्ती " कंपनी एक्स" चा मालक / संचालक / भागिदार / बहुसंख्या भागधारक असेल तीच व्यक्ती " कंपनी वाय " ची मालक / संचालक / भागिदार / बहुसंख्य भागधारक नसावी.

३. निर्माणकर्त्याचा अधिकृत विक्रता, ठोक व्यापारी यांना दरपत्रक सादर करता येतील. दरपत्रकात पुरठा करण्यात येणा-या बाबी बददलची सविस्तर माहिती जसे मॉडेल, मेक इत्यादी नमुद करणे आवश्यक आहे. निर्माणकर्ता ( Manufaturer) यांचे अधिकृत विक्रता / ठोक व्यापारी असणेबाबतचे पत्र सादर करणे आवश्यक आहे.

४. संस्थेचा मागील तीन वर्ष शासकीय/खाजगी रुग्णालयातील / कार्यालयातील संगणक, नेटवर्कींग व प्रिंटर्स देखभाल व दुरुस्ती काम केल्याचा अनुभवाचा दाखला

५. आपल्या व्यापारी संस्थेचा वस्तु व सेवा कर क्रमांक ( GST Number ) प्रमाणपत्र व पॅन कार्ड ची छायांकित प्रत जोडावी.

६. संस्था / दुकान शॉप ॲक्ट प्रमाणपत्र, साहित्य पुरवठा / विक्री विषयक वैध नोंदणी दाखला सोबत जोडावा.

७. दरपत्रके सादर करण्यासाठी पत्ता / ठिकाण - प्रशासकिय कार्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक

८. यादी मधील ( दैनंदीन वापरासाठी लागणारे नित्योपयोगि साहित्य / वस्तु इत्यादी ) या कार्यालयाचे रुग्णालयाचे आवश्यकतेनुसार खरेदी केली जातील.

९. विहित कालवधीत पुरवठा न झाल्यास शासकिय नियमानुसार दंडात्मक कार्यवाही (रु.५०० प्रमाणे प्रति दिन प्रमाणे)केली जाईल याची नोंद घ्यावी.

१०. विहीत नमुन्यातील वस्तु व सेवा कर (GST Number) सहीत देयके स्विकारण्यात येतील, दर हे सर्व करांसहीत व उचल ठेव हमाली पोहच खर्चासहीत असावे.

११. खरेदी केलेल्या बाबींची पोहच जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे करावी लागेल

१२. मंजूर न्युनतम दरांवर पुरवठाधारकास पुरवठा करणे शक्य न झाल्यास व वाढीव दराने खरेदी करावी लागल्यास फरकाची रक्कम न्युनतम दर धारकाकडून वसुल केली जाईल.

१३. संगणक व इतर अनुषंगिक बाबीच्या देखभालीचा दर्जा हा सर्वोत्तम असावा. वस्तू हया आय.एस.आय. मार्क किंवा आयएसआय मार्कशी समांतर दर्जाधारक असावा.

१४. ईच्छुक पुरवठाधारकास कोणत्याही शासकीय विभागाने खरेदी प्रक्रियेसाठी काळया यादीत टाकलेले नसल्या बाबतचे प्रमाणपत्र लिहुन देणे बंधनकारक आहे.

१५. दरपत्रक स्विकारण्याची मुदत प्रसिध्दी दिनांकापासुन आठ दिवस संध्याकाळी ५ वाजेपर्यंत असेल ( कार्यालयीन सुटटी वगळूण ) उशिरा प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१६. दरपत्रके उघडण्याची प्रसिध्दी दिनांकापासुन आठ दिवस संध्याकाळी ५ नंतर ६ वाजे पर्यंत राहील किंवा या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली जाईल.

१७. कोणतेही लेखी तोंडी कारण न देता दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा संपूर्ण अथवा काही भागांबाबत ( काही वस्तुंबाबत ) खरेदी प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे व खरेदीचे सर्व अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांनी राखुन ठेवले आहेत. मान्य न्युनतम दर एक वर्षासाठी वैध राहतील.

( डॉ. चारुदत्ता शिंदे )
जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक

## व्यापारी लिफाफा

## संगणक नेटवर्कींग व प्रिंटर्स देखभाल व दुरुस्ती करार

| अ.क्र. | साहित्याचे नांव | दर एका नगास रु ( जीएसटी सह) | दर प्रत्येक एका नगास अक्षरी रुपये (जीएसटीसह) |
|---|---|---|---|
| १ | AMC Charges for Computer Per Nog (Non Comprehensive) | | |
| २ | AMC Charges for Printer Per Nog (Non Comprehensive) | | |
| ३ | AMC Charges for Netwarking Maintenance (Non Comprehensive) | | |
| ४ | AMC Charges for Biomeatrics Machine (Non Comprehensive) | | |

१. दरपत्रके सिलबंद करुन प्रशासकिय कार्यालय, जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे पाठविण्यात यावे.
२. वरिल यादीतील संगणक, नेटवर्कींग व प्रिंटर्स देखभाल व दुरुस्ती
३. दरपत्रके मंजूर अथवा नामंजुर करण्याचे अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक यांनी राखुन ठेवले आहेत.

सही/-

पुरवठा धारकांचे नांव
पुरवठा संस्थेचे नाव
पत्ता